**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१२४/२०२३ मधील निशाणी क्र.२७ वरील आदेश</u>**

१. सदरचा अर्ज, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदर दाव्यास लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरिता केला आहे.

२. सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ चे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ही वयोवृध्द असल्याने, तसेच त्या अचारी असल्याने, प्रतिवादी यांना सदर प्रकरणात मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सदर दाव्याची खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्याकरिता व दाव्याचा अंतिम निकाल लागण्याकरिता प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत दाखल न करुन घेतल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जावर वादीतर्फे वकीलांनी म्हणणे देऊन हरकत घेतली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर अर्जामध्ये प्रतिवादींनी कोणतेही समाधानकारक कारण दिलेले नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज खर्चासहीत फेटाळण्याची विनंती केली. न्यायालयास जर सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटल्यास जास्तीत जास्त दंडात्मक रक्कम आकारुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले.

५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचा दावा वादींनी मालकी हक्क ठरावाकरिता व कायमच्या मनाई हुकुमाकरिता दाखल केला आहे. कायदयानुसार कोणत्याही दाव्याचा

गुणदोषावर निकाल करण्याकरीता सर्व पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे असते. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दिनांक १२/०९/२०२३ रोजी समन्सची बजावणी होऊन ते दिनांक १८/०९/२०२३ रोजी दाव्यात हजर झाले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे वकीलांनी निशाणी क्र.१७ व १८ येथे कैफियत दाखल करण्यास मुदत अर्ज दिला होता व न्यायालयाने सदरचे अर्ज मंजूर केले होते. त्यानंतर सदर प्रकरणात तीन तारखा उलटून देखील प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी कैफियत दाखल केली नाही. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदरचा अर्ज हा दिनांक १३/०२/२०२४ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच सदरचा अर्ज दाखल करण्यास त्यांना २ महिने विलंब झालेला आहे. त्यामुळे विलंबाचा कालावधी पाहता, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्यावर खर्च बसवुन त्यांना कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादी यांना खर्च रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे) देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. |
| ३ | प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादीस वर नमुद खर्च रक्कम अदा केल्यानंतर त्यांची लेखी कैफियत अभिलेखावर दाखल करावी व सदर कैफियतीची एक प्रत वादीस द्यावी. |

सही/–
(**सुजाता रा. शिंदे**)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.
जि. रायगड

ठिकाण – कर्जत
दिनांक – १३/०२/२०२४